# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 27.03.2025** **वार-गुरुवार**

---

**जिल्हा परिषद**

प्रशासकीय कामकाजात सुलभता यावी या उद्देशानं कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी पुणे जिल्हा परिषद प्रयत्नशील आहे. याचाच एक भाग म्हणून मुख्यालयातील 360 कर्मचारी आणि ऑनलाइन माध्यमातून जवळपास 450 कर्मचाऱ्यांना नुकतंच विशेष प्रशिक्षण देण्यात आलं. सर्व कर्मचाऱ्यांनी दैनंदिन कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्तेचा अधिकाधिक वापर करावा असं आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी यावेळी केलं.

**गुढीपाडवा**

पुण्यातील तुळशीबागेतल्या श्रीरामजी संस्थानच्या श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. येत्या 30 मार्चपासून म्हणजे गुढीपाडव्यापासून श्रीरामनवमी उत्सवाला प्रारंभ होणार आहे. यामध्ये विविध धार्मिक आणि सांगीतिक कार्यक्रम होणार आहेत; अशी माहिती संस्थानचे कार्यकारी विश्वस्त भरत तुळशीबागवाले यांनी दिली. दरम्यान गुढीपाडव्याच्या निमित्तानं पुण्यातील विविध संस्था संघटनांनीही अनेक कार्यक्रम आयोजित केले आहेत. जनसेवा न्यास दर वर्षीप्रमाणे यंदाही गुढीपाडव्याच्या दिवशी हिंदू महिला महोत्सव आयोजित करत आहे. या अंतर्गत महिलांची दुचाकी फेरी काढली जाणार असून, या महिला 100 कोटी लिटर पाणी बचतीचा संकल्प करून पाणी बचतीची शपथ घेणार आहेत.

**पीएम पीएम एल**

येत्या शनिवारी छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त वढू बुद्रुक इथं जाण्यासाठी पीएमपीएमएलतर्फे 30 अतिरिक्त बस सोडण्यात येणार आहेत. पुणे महापालिका भवन, पुणे रेल्वे स्थानक, स्वारगेट, हडपसर, भोसरी आणि निगडी इथून सकाळी सहा वाजल्यापासून दर 45 मिनिटांनी या बस सुटतील असं पीएमपीएमएलनं कळवलं आहे.

**चेटीचंड महोत्सव**

सिंधी समाजाचं नूतन वर्ष आणि भगवान साई झुलेलाल यांच्या जन्मोत्सवानिमित्त सिंधू सेवा दलातर्फे येत्या रविवारी ‘चेटीचंड’ महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. येरवडा इथल्या डेक्कन कॉलेज ग्राउंडवर होणाऱ्या या महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि सिंधी समाज बांधवांचा मेळावा होणार असल्याचं संस्थेचे अध्यक्ष अशोक वासवानी यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं.

**चापेकर**

चिंचवड गावातील क्रांतिवीर चापेकर यांचा वाडा, ऐतिहासिक स्मारक म्हणून जतन केला जात आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती संयुक्तपणे हे स्मारक उभारत आहेत. या स्मारकाचं काम आता अंतिम टप्प्यात असून येत्या 17 एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या स्मारकाच्या उद्घाटनाचं नियोजन करण्यात येत आहे; या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रही पाठवलं आहे, असं पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितलं.

**स्वारगेट प्रकरण**

स्वारगेट स्थानकातील महिला अत्याचार प्रकरणातील पीडितेने प्रधान सचिवांना पत्र लिहिलं असून, यामध्ये पीडित महिलेचं ऐकून घेत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसंच असीम सरोदे यांनी पीडितेचे वकील म्हणून काम पाहावं अशी मागणीही या पत्रात करण्यात आली असल्याचं वकील असीम सरोदे यांनी आज सांगितलं.

**एसटी**

उन्हाळी सुट्ट्यामध्ये प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन पुणे एसटी विभागानं 15 एप्रिलपासून टप्याटप्याने अतिरिक्त बस सोडण्याचं नियोजन केलं आहे. 15 जूनपर्यंत या जादा बस फेऱ्यांचं नियोजन आहे, अशी माहिती विभाग नियंत्रक अरुण सिया यांनी दिली आहे.

**रेल्वे**

विलासपूर विभागातील कोटरलिया स्थानकात 11 ते 19 एप्रिल दरम्यान विद्युतीकरण करण्यात येणार आहे. यामुळे पुणे संत्रागाची एक्सप्रेस, पुणे हावडा आझादहिंद एक्सप्रेस, पुणे हावडा दूरंतो एक्सप्रेस या गाड्या रद्द करण्यात आल्या असल्याचं मध्य रेल्वेने कळवलं आहे.

**पुणे मनपा**

पुणे शहरातील कात्रज जांभुळवाडी आणि पाषाण इथल्या तलावातील गाळ काढण्याचं काम जलसंपदा यांत्रिकी विभागाकडे देण्यात आलं आहे. त्यासाठी  चार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे, अशी माहिती पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बीपी यांनी दिली. गाळ काढण्याबाबत अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक महापालिकेत झाली त्यानंतर  आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

**उन्हाची तीव्रता**

पुणे शहर आणि परिसरात उन्हाची तीव्रता वाढते आहे; वाढत्या तपमानामुळे धावत्या वाहनांना अचनाक आग लागण्याच्या घटना घडू शकतात; या पार्श्वभूमीवर पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयानं व्यावसायिक वाहनांची तपासणी मोहीम हाती घेतली आहे. वाहनांमध्ये सुरक्षात्मक उपाययोजना आणि अन्य आवश्यक नियमांचं पालन होत आहे किंवा नाही, याची पडताळणी करण्यात येणार आहे, असं पुणे उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांनी सांगितलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल 37 अंश तर किमान 19 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्या कमाल तापमानात आणखी थोडी वाढ होईल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, विविध भारती पुणे केंद्रावर; संध्याकाळी 6 वाजता; ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**